# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd-1962
NAAC 'A++'Grade

## ५८ वा वार्षिक दीक्षांत समारंभ (आभासी पद्धतीने)

## सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालये व विद्यार्थ्यांसाठी अधिसूचना

- शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या मुख्य इमारतीतील राजर्षी शाहू सभागृहात शनिवार दिनांक ०५ मार्च, २०२२ रोजी सकाळी १०.४५ पासून ऑनलाईन पद्धतीने संपन्न होत आहे. या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून श्री. भगत सिंह कोश्यारी, मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व मा. कुलपती, शिवाजी विद्यापीठ तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. दिनकर साळुंखे, डायरेक्टर, इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटीक इंजिनिअरींग अॅन्ड बायोटेक्नॉलॉजी, नवी दिल्ली व सन्माननीय अतिथी मा. नामदार श्री. उदय सामंत, मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य हे ऑनलाईन उपस्थित राहणार आहेत.

- विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयान्वये महाविद्यालयीन स्तरावर होणारे पदवी वितरण कार्यक्रम कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे होणार नाहीत व सर्व पदवी प्रमाणपत्रे अर्जावरील नमूद पत्त्यावर पोष्टाव्दारे पाठविण्यात येतील.

- सदर समारंभ ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने व सर्व पदवी प्रमाणपत्रे व पारितोषिक प्रमाणपत्रे पोष्टाद्वारे पाठविण्यात येणार असल्याने **विद्यार्थ्यांनी विद्यापीठात उपस्थित राहू नये,** अशा सर्व विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/58convocation) या सदरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- ५८ व्या दीक्षांत समारंभाचे थेट प्रसारण दिनांक ०५/०३/२०२२ रोजी सकाळी १०.४५ ते दुपारी १२.०० पर्यंत You tube Link : https://www.youtube.com/c/ShivVarta/ व्दारे पाहता येईल.

**गजानन पळसे**
**प्र.संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**दीक्षांत विभाग**
**दि .: ०३/०३/२०२२**